DISTRICT MAGISTRATE
महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते
JALNA

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**जिल्हादंडाधिकारी कार्यालय,जालना**
प्रशासकीय इमारत, सर्वे नं.488, जालना

दुरध्वनी क्रमांक 02482-225502 फॅक्स क्र. 02482-225326
Website www.jalna.nic.in Email : rdcjalna@gmail.com

---

**वाचा :** 1.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) व (2)
2.पोलीस अधिक्षक, जालना यांचे पत्र क्रमांक जिविशा/धनगर आरक्षण आंदोलन/संचारबंदी आदेश/2026-339 जालना दिनांक 16.01.2026

---

जा.क्र.2026/आरबी-डेस्क-1/पोल-1/ /कावी-21 दिनांक 16.01.2026

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) व 163 (2) प्रमाणे मनाई आदेश**

**आदेश :-**

ज्याअर्थी, माझ्या असे निर्दशनास आणून देण्यात आाले आहे की, धनगर समाजास एस.टी. प्रवर्गामधून आरक्षण अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीचे अनुषंगाने श्री.दिपक भिमराव बो-हाडे, रा.गोंधनखेडा, ता.जाफ्राबाद, जि.जालना ह.मु. छत्रपती कॉलनी, जुना जालना, ता.जि.जालना हे दिनांक 17.01.2026 रोजी 10.00 वा.सुमारास जालना येथून आझाद मैदान मुंबई येथे उपोषणास बसण्याकरीता रवाना होणार आहेत.

आणि ज्याअर्थी, श्री.दिपक भिमराव बो-हाडे यांना पोलीस ठाणे आझाद मैदान पोलीस ठाणे मुंबई यांचे जा.क्र.620/कावसु/2026 दिनांक 15/01/2026 रोजी कलम 168 भारतीय नागरिक सुरक्षा संहिता -2023 अन्वये नोटीस देवुन सदरील आमरण उपोषणाची परवानगी नाकारली आहे.

तसेच ज्याअर्थी, श्री.दिपक भिमराव बो-हाडे हे आझाद मैदान मुंबई कडे धनगर समाजाला अनुसुचित जमाती मध्ये समाविष्ठ करण्यात यावे या मागणीच्या अनुषंगाने जालना येथुन अंबड, जामखेड, पाचोड, दावलवाडी, पैठण नाका, शेवगाव अहिल्यानगर, पाथर्डी अहिल्यानगर व तसेच समोर पंढरपुर, सांगोला, पुणे जिल्ह्यातुन मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण करिता रवाना होणार असल्याने संबंधित जिल्ह्यामध्ये सध्या सार्वत्रिक जिल्हा परिषद निवडणुक 2026 नुसार आदर्श आचारसंहिता सुरु असल्याने त्यांना संबंधित जिल्ह्यामधुन आंदोलनकर्ते यांचेसह जाण्याची परवानगी नाकारण्यात आली असून पोलीस अधिक्षक कार्यालय जालना यांचे कडील पत्र जा.क्र. जिविशा/कावसु 324/2026 संदर्भिय नोटीस अन्वये उपरोक्त सर्व माहीती श्री. दिपक भिमराव बो-हाडे यांना कळविण्यात आली असुन आंदोलनाची परवानगी नाकारण्यात आलेली आहे. तरी एकंदरीत परिस्थिती पाहता श्री. दिपक भिमराव बो-हाडे यांना आंदोलनाची परवानगी नाकारण्यात आलेली असल्याने धनगर समाजाचे आंदोलनकर्ते जालना व अंबड शहरात विविध ठिकाणी एकत्र जमा होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याची शक्यता असल्याची मी स्वत: खात्री केलेली आहे. त्यामुळे संपुर्ण जालना शहर व अंबड शहराकरीता संचारबंदीचे आदेश लागू करण्याचे निर्णयाप्रत मी आले आहे.

त्याअर्थी, वेळेअभावी सर्व संबंधीत यांना नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने, मी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,जालना मला प्राप्त अंगीभूत अधिकाराचा वापर करुन **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) व 163 (2)** अन्वये **संपुर्ण जालना शहर व अंबड शहराकरीता दिनांक 17.01.2026 रोजीचे 05.00 वाजेपासून ते 24.00** वाजेपर्यंत संचारबंदी लागू करीत आहे.

सदरील संचारबंदी आदेश शाळा/महाविद्यालये, दुकाने, आस्थापना यांना ही लागू राहतील. तसेच कोणत्याही प्रकारचे शस्त्र, ज्वलनशील पदार्थ, स्फोटके सोबत बाळगता येणार नाहीत.

Scanned with OKEN Scanner